ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.
**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF/AZ/AUR/R/136/2008/57/** **Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Kaduba Baburao Bhanuse, At.Takli Post. Kaygaon Tq.Sillod Dist. Aurangabad.

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum Shri Kaduba Baburao Bhanuse, At.Takli Post. Kaygaon Tq.Sillod Dist. Aurangabad.

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing of the grievance is fixed on date 14.10.2008 at 12.30 Hrs.**

**Encl As above**.

**Member/Secretary,**
**CGRF(AZ) MSEDCL,Aurangabad.**

Copy to:-
Shri Kaduba Baburao Bhanuse,
At.Takli Post. Kaygaon,
Tq.Silod Dist. Aurangabad

**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

**औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.**

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/१३६/२००८/५७**

**तक्रार दाखल दिनांक ;- २५/०९/२००८**
**निकाल दिनांक ;- १०/११/२००८**

**श्री कडुबा बाबुराव भानुसे,**
**मु.टाकळी पोस्ट कायगांव,**
**ता.सिल्लोड जिल्हा औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.नविन वीज जोडणी ) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,)**
**औरंगाबाद. गैरअर्जदार**

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २५/०९/२००८ रोजी जालना शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १४/१०/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने शेतीपंपासाठी लागणा-या वीज पुरवठ्याकरीता महावितरण कंपनीकडे अर्ज दाखल केला. महावितरण कंपनी तर्फे देण्यात आलेले ५२७०/-रूपयाचे कोटेशन त्यांनी दिनांक ०९/१२/२००५ रोजी भरले. त्यांच्या विहीरीजवळ लाईन उपलब्ध असतांना त्यांना वीज पुरवठा करण्यात आला नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. महावितरणच्या संबंधीत विभागाकडे अनेकदा पर्यंत्न करून सुध्दा त्याचप्रमाणे दिनांक २६/०२/२००८ रोजी पत्र व्यवहार करून सुध्दा त्यांच्या तक्रारीची दखल महावितरण कंपनीने न घेतल्यामुळे अर्जदाराने ही तक्रार मंचात दाखल केली असुन त्यांना वीज पुरवठा तसेच नुकसान भरपाई देण्याबाबतचे आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक १४/१०/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अर्जदार यांचे प्रतिनिधी श्री रामदास बलांडे उपस्थित होते. महावितरण कंपनी तर्फे नोडल अधिकारी श्री जे.जी.जैस्वाल उपस्थित होते. याप्रकरणाची कागद पत्रे त्यांच्या उपविभागाकडुन मिळाली नसल्यामुळे त्यांनी सुनावणीची तारीख पुढे वाढविण्यासाठी अर्ज दाखल केला. मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करत सुनावणीची पुढील तारीख व या प्रकरणातील सर्व कागद पत्रे दाखल करण्याबाबतचे आदेश देत पुढील सुनावणी २१/१०/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक २१/१०/२००८ रोजी अर्जदार प्रतिनिधी हजर होते. नोडल अधिकारी अथवा त्यांचा अधिकृत प्रतिनिधी गैरहजर होते. त्यामुळे मंचाने नोडल अधिकारी यांना जवाब दाखल करण्यासाठी शेवटची संधी देत पुढील सुनावणी दिनांक ०४/११/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक ०४/११/२००८ रोजी अर्जदार प्रतिनिधी श्री रामदास बलांडे तसेच नोडल अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री ए.पी.बन उपस्थित होते अर्जदाराच्या

तक्रारीवर त्यांनी आपला जवाब मंचात दाखल केला. अर्जदाराने टेस्ट रिपोर्ट न दिल्यामुळे त्यांना वीज पुरवठा करण्यात आला नसल्याचे त्यांनी आपल्या जवाबात म्हटले आहे. अर्जदाराने टेस्ट रिपोर्ट दाखल केला तर त्यांना त्वरीत वीज पुरवठा करता येईल असेही त्यांनी आपल्या जवाबात पुढे म्हटले आहे.मंचाने दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकल्यानंतर प्रकरण निकालासाठी राखून ठेवले.

५) अर्जदार व नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागद पत्रावरून असे आढळुन येते की, अर्जदाराने शेतीपंपासाठी केलेल्या वीज पुरवठ्याच्या मागणी नंतर महावितरण कंपनी तर्फे अर्जदारास ५२७०/- रूपयाचे कोटेशन देण्यात आले, ज्याचा भरणा अर्जदाराने दिनांक ०९/१२/२००५ रोजी केलेला असल्याचे दिसुन येते. नोडल अधिकारी यांच्या प्रतिनिधीने दाखल केलेल्या शेतीपंपधारक ग्राहकाची जेष्ठता यादी याचे अवलोकन केल्यावर कमांक १४८ वर अर्जदाराचे नांव समाविष्ठ करण्यात आले असुन लाईन उभारणी व चाचणी अहवाल यांच्या समोर **S/C** (सर्विस कनेक्शन) व **NO T R** असे नमुद केलेले आढळुन येते. यावरून वीज पुरवठा करण्याच्या जागी लाईन उपलब्ध असुन टेस्ट रिपोर्ट दाखल केलेला नाही अशी स्थिती असल्याचे स्पष्ट होते.अर्जदाराने दिनांक २६/०२/२००८ रोजी महावितरण कंपनीच्या सहाय्यक अभियंता सिल्लोड यांना वीज पुरवठा करण्याबाबत स्मरण पत्र दिले असल्याचे दिसुन येते. पण सदरील पत्राची दखल घेतली नाही अथवा टेस्ट रिपोर्ट बाबत कसलीही मागणी केलेली दिसुन येत नाही अर्जदार हे ग्रामीण भागात राहणारे शेतकरी असुन त्यांना महावितरण कंपनीच्या वीज पुरवठा करण्यासाठी असणा-या सर्व नियामांची माहीती असणे अपेक्षीत नाही. अर्जदाराने डिसेबर २००५ मध्ये कोटेशन भरले असल्यामुळे व वीज पुरवठा करण्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष लाईन उपलब्ध असतांना महावितण कंपनीकडुन टेस्ट रिपोर्ट ची मागणी करून व वीज पुरवठा करून त्यांच्याकडे असलेल्या प्रलंबित यादीतील संख्या कमी करता आली असती. केंद्र व महाराष्ट्र शासनाने एकीकडे शेतक-याच्या अर्थिक उन्नतीसाठी अनेक योजना

जाहीर केल्या आहे व करीत आहे तर दुसरीकडे विहीरीत पाणी असतांना टेस्ट रिपोर्ट दाखल केला नाही अशी तांत्रीक बाबीवरून शेतीपंपासाठी वीज पुरवठा देण्यात आला नसल्याचे चित्र दिसत आहे. महावितण कंपनीने शेतीपंपाच्या वीज ग्राहकांना जलद गतीने वीज पुरवठा करण्याबाबत सकारात्मक धोरण स्विकारण्याची मंच अपेक्षा करीत आहे.

वरील सर्व निरीक्षणावरून मंच खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) अर्जदाराने टेस्ट रिपोर्ट दाखल केल्यानंतर सात दिवसाच्या आत वीज पुरवठा देण्यात यावा.

२) महावितरण कंपनीने अर्जदाराने दिनांक ०९/१२/२००५ रोजी वीज पुरवठ्याकरीता भरलेल्या रूपये ५२७०/- रक्कमेवर द.शा.द.शे ६ टक्के दराने व्याज द्यावे व अर्जदारास देण्यात येणा-या पहील्या वीज बिलातुन त्याची वजावट करावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१३६/२००८/५७** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री कडुबा बाबुराव भानुसे,**
**मु.टाकळी पोस्ट कायगांव,**
**ता.सिल्लोड जिल्हा औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.नविन वीज जोडणी )**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१३६/२००८/५७ )

आपण दिनांक २५/०९/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. ग्रामिण मंडळ,औरंगाबाद.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**